जैवविविधतेच्या चळवळी
औद्योधिक कंपन्यांचे पाठबळ

chaitrali.chandorkar@timesgroup.com
Tweeter - chaitralicMT

आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांबरोबरच आता जैवविविधता संवर्धनाच्या कामातही औद्योगिक कंपन्या सहभागी होणार आहेत. निसर्ग संरक्षणाला प्राधान्य देत शाश्वत विकासाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयाने इंडिया बायोडायव्हर्सिटी बिझनेस इनिशिएटिव्ह ही योजना आखली आहे. या अंतर्गत देशातील नामांकित कंपन्या शासनाच्या बरोबरीने जैवविविधतेला प्राधान्य देत धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करणार आहेत.

जैवविविधता संवर्धन ही एकट्या शासनाची जबाबदारी नसून यामध्ये स्वयंसेवी संस्थांबरोबरच औद्योगिक कंपन्यांचा सक्रिय सहभाग हवा, या कंपन्यांनी विस्ताराचे नियोजन करताना निसर्ग संवर्धनाचाही विचार करावा, या उद्देशाने पर्यावरण मंत्रालयाने दोन वर्षांपूर्वी उद्योग क्षेत्राच्या सहभागातून जैविविधता संरक्षणाचा (आयबीबीआय) प्रस्ताव ॅसीआयय ेसमोर मांडला. सीआयआयनेही या संकल्पनेचे स्वागत केले. विशेष म्हणजे गेल्या वर्षभरात देशातील 26 नामांकित कंपन्या यामध्ये सहभागी झाल्या आहेत. प्रायोगित तत्वावर सुरू झालेली ही योजना आता आक्रमकरित्या राबविण्यात येणार आहे. या कंपन्यांच्या सहभागातून जलसंवर्धन-व्यवस्थापन, परिसंस्थांचे संवर्धन, मातीची गुणवत्ता सुधारणे, वृक्षाच्छादन वाढविणे, जैवविविधतेचे डॉक्युमेंटेशन आणि कंपन्यांसाठी कायदेशीर धोरणे आखणे अशी महत्वाची कामे करून घेण्यात येणार आहेत.

उद्योग क्षेत्राला जैविविधतेच्या संरक्षणात सहभागी करून घेण्याचा उपक्रम निश्चितच स्वागतार्ह असून अनेक चांगल्या कंपन्या स्वच्छेने यात सहभागी होत आहेत. हैदराबादमध्ये झालेल्या जागतिक जैवविविधता परिषदेमध्ये आमच्या समोर पहिल्यांदा हा विचार मांडण्यात आला होता. पहिल्याच टप्प्यात  सोळा कंपन्यांनी यात सहभागी होण्याची तयारी दर्शविली. सध्या 26हून अधिक कंपन्या विविध पातळ्यांवर काम करीत आहेत. एवढेच नव्हे तर कंपनीमध्ये वैयक्तिक पातळीवरीही शाश्वत विकासावर आवर्जून भर दिला जातो आहे. दिवसेंदिवस जागृती वाढत असल्याने परदेशी संस्थांकडूनही यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत उपलब्ध होण्यास सुरुवात झाली आहे, अशी माहिती टाटा केमिकल्सचे व्यवस्थापकीय संचालक आर. मुकुंदन यांनी माहिती दिली.

टाटा केमिकल कंपनीतर्फे सध्या गुजरातमध्ये संकटग्रस्त वेल शार्क या माशांच्या संरक्षणासाठी गुजरात सरकारच्या सहभागातून उल्लेखनीय काम सुरू आहे. या उपक्रमाबद्दल कंपनीला संयुक्त राष्ट्रसंघाने सन्मानित केले आहे.

विकासासाठी एवढी वर्षे नैसर्गिक संपत्ती घेतली, आता ती परत देण्याची वेळ आली आहे. नैसर्गिक संपदा, जैवविविधता वाचविण्याच्या चळवळीमध्ये शासनाने स्वयंसेवी संस्था आणि उद्योग क्षेत्रालाही सहभागी करून घेतले आहे. आयबीबीआयच्या माध्यमातून अनेक कंपन्या पुढे आल्या असून विविध पातळ्यांवर निसर्ग संवर्धनाचे चांगले काम सुरू आहे, असे केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयाचे वरिष्ठ सल्लागार जे. आर. भट्ट यांनी सांगितले.

द एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट (टेरी)तर्फे दिल्लीमध्ये जागतिक शाश्वत विकास परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या पहिल्या सत्रात आययूसीएन यांच्या संयुक्त विद्यमाने जैवविविधतेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक आहे सक्षम उद्योग क्षेत्र या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी मुकुंदन आणि भट्ट यांनी या उपक्रमाची माहिती दिली. या वेळी विविध कंपन्यांतर्फे राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.